| MHAK070001062012 | <u>नियमित दिवाणी दावा क्र. १६/२०१२ मधील</u><br><u>निशाणी क्र.२०४ वर आदेश</u><br>दिपककुमार वि. राजकुमार<br>(दिनांक २२ ऑक्टोबर, २०२४) |
|---|---|

१.        प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दि.प्र.सं. आ.६ नि.१७ प्रमाणे सादर केला असून त्यामध्ये असे कथन करण्यात आले आहे की, प्रस्तुत दावा हा वाटणी, स्वतंत्र ताबा आणि मनाई हुकुमाकरीता दाखल केलेला असून दाव्यातील परिच्छेद क्र.१–अ मध्ये शेत मिळकतीचे वर्णन नमुद केलेले असून परिच्छेद क्र.१–ब मध्ये घर मिळकतीचे वर्णन नमुद केलेले आहे. दाव्यात अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर असे निदर्शनास आले की, परिच्छेद क्र.१–अ मध्ये नमुद असलेल्या मिळकतींचे सर्व्हे क्रमांक आणि गावाचे नाव या विषयी काहीही नमुद केलेले नाही. त्यामुळे अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती करणे आवश्यक आहे. सदर दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही किंवा प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती वादीने केली.

२.        प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरीक्त उर्वरीत प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास कोणतेही म्हणणे दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचा लेखी जबाब (नि.क्र.२०६) दाखल करुन प्रस्तुत प्रखर विरोध करुन असे कथन केले आहे की, दाव्यामध्ये अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे. सदर प्रकरण हे अत्यंत जुने असून वादीने केवळ प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने अर्ज सादर केलेला आहे. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी केली आहे.

३.        अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला तसेच वादीतर्फे ॲड ए. पी. जगताप आणि प्रतिवादी क्र.१ ते ३ तर्फे ॲड एस. टी. इंगळे यांचा युक्तीवाद ऐकला, इतर प्रतिवादींतर्फे कोणीही हजर नाही.

४.        अर्जाचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, प्रस्तुत दावा दिनांक १२.०७.२००१ रोजी दाखल झालेला असून त्यामध्ये सर्व

पक्षकारांचा अंतिम युक्तीवाद पुर्ण झालेला असून प्रकरण न्यायनिर्णयाकरीता होते, परंतु न्यायालयाने प्रकरणाचा अभिलेख तपासला असता दाव्यातील परिच्छेद क्र.१–अ मध्ये नमुद केलेल्या शेत मिळकती कोणत्या गावामध्ये अस्तित्वात आहेत, याविषयी काहीही नमुद केले नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. त्यामुळे दिनांक ०७.०५.२०२४ रोजी नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन दाव्यातील परीच्छेद क्र.१–अ मधील वाद मिळकतींचे वर्णन अपुरे असुन त्याची दखल घेण्यात यावी, असा आदेश पारीत करण्यात आला होता. त्यानंतर, दिनांक १२.०६.२०२४, ०९.०७.२०२४ आणि ०६.०८.२०२४ इत्यादी तारखांना वादीच्या विधीज्ञांनी दिनांक ०७.०५.२०२४ रोजीच्या नि.क्र.१ वरील आदेशाची नोंद घेवून आवश्यक ती पुर्तता करण्याकरीता कोणतीही परिणामकारक पावले उचलली नाहीत. दिनांक ०६.०८.२०२४ रोजी विधीज्ञ बाहेरगावी गेले असल्यामुळे पुढील तारीख मिळण्याबाबत सादर केलेला अर्ज (नि.क्र.२०२) नामंजुर करण्यात आला होता. यावरुन असे दिसून येत आहे की, प्रकरण हे २० वर्षांपेक्षा अधिक जुने असूनही वादीच्या विधीज्ञांनी योग्य वेळेत आवश्यक पावले उचलली नाहीत. विशेष म्हणजे दाव्यामध्ये अंतिम युक्तीवाद पुर्ण होईपर्यंत दाव्यातील वाद मिळकतींचे वर्णन अपुरे आहे, ही बाब वादी तसेच त्यांच्या विधीज्ञांनी विचारात घेतली नाही. अंतिम युक्तीवाद झाल्यानंतरही सदर बाबीची वादीतर्फे स्वतःहुन दखल घेण्यात आली नाही. न्यायालयाने नि.क्र.१ वर आदेश पारीत केल्यानंतरही वादी यांनी त्या आदेशाची तात्काळ दखल घेतली नाही.

**५.** प्रस्तावित दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही किंवा दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही, हे जरी खरे असले तरी दाव्यामध्ये अंतिम युक्तीवाद होईपर्यंत दाव्यातील वाद मिळकतींचे वर्णन अपुरे आहे, या बाबीची वादीतर्फे दखल घेण्यात आली नाही, ही बाब अत्यंत गंभीर आहे. प्रस्तुत दावा २० वर्षांपेक्षा अधिक जुना आहे. न्यायाच्या दृष्टीने संबंधीत दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक आहे, प्रस्तावित दुरुस्ती केल्यामुळे दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्यासाठी न्यायालयाला मदत होणार आहे, हे जरी खरी असले तरी वादीवर कॉस्ट बसविणे आवश्यक आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

# <u>आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज नि.क्र.२०४ रक्कम रु.२,०००/–कॉस्ट भरण्याच्या अटीस अधीन राहून मंजुर करण्यात येत आहे.

२. कॉस्ट रकमेपैकी रु.१,०००/– प्रतिवादी यांना देण्यात यावी आणि उर्वरित रक्कम रु.१०००/– ही महाराष्ट्र शासनाच्या खात्यात जमा करण्यात यावी.

३. प्रस्तावित दुरुस्ती पुढील तारखेच्या आत करुन दाव्याची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करण्यात यावी.

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2024.10.22 15:45:35 +0530

**दिनांक : २२/१०/२०२४.**
**ठिकाणः बाळापूर**

**( विष्णु द. गिते )**
**सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),**
**बाळापूर.**

| | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same, word to word, as per the original order. | | |
| Name of the Court | :- | **Shri. Vishnu D. Gite**<br>Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C., Balapur |
| Name of the Stenographer | :- | Ajay N. Hande |
| Date of Decision | :- | 22/10/2024 |
| Order signed by P.O on | :- | 22/10/2024 |
| Order uploaded on | :- | 22/10/2024 |